# गुरूंचे मांजर

## गुरुमाई चिद्विलासानंद यांनी सांगितलेली एक गोष्ट

एके काळी नेपाळमधील काठमांडू या शहरात एक आश्रम होता, जिथे एक गुरू आपल्या शिष्य-परिवारासह राहत असत. त्या आश्रमात एका मांजराचेही वास्तव्य होते. ते मांजर फारच गोड होते, अतिशय मनमिळाऊ व इतरांना खूश करण्यासाठी सदैव तत्पर. आश्रमातील सर्व लोक त्या मांजराला चांगले खाऊ-पिऊ घालत आणि ते मांजर त्या सर्वांचेच अतिशय लाडकेही होते.

फक्त एकच समस्या होती : आश्रमातील दैनंदिन कार्यक्रमात मांजरालाही भाग घ्यावासा वाटे. परंतु मांजराच्या कार्यक्रमातील या सहभागामुळे गुरूंच्या आणि शिष्यगणांच्या नामसंकीर्तनाच्या आणि ध्यानाच्या अभ्यासादरम्यान मात्र व्यत्यय निर्माण होऊ लागला. कारण काय? गुरू आणि शिष्यगण जेव्हा नामसंकीर्तन करत असत, तेव्हा ते मांजर मोठ्याने ओरडत असे. तसेच जेव्हा सगळेजण ध्यान करीत असत, तेव्हा ते मांजर मोठमोठ्याने घोरत असे.

त्यामुळे, गुरूंनी आदेश दिला की दररोज, नामसंकीर्तनाच्या आणि ध्यानाच्या वेळी त्या मांजराला दुसऱ्या खोलीतील एका खांबाला बांधून ठेवावे. शिष्यगणांनी गुरुआज्ञेचे पालन केले आणि त्यामुळे दैनंदिन कार्यक्रमाचे अनुशासन पुन्हा पूर्ववत् झाले. आता मांजराकडून कोणत्याही प्रकारचा व्यत्यय निर्माण होत नसे आणि नामसंकीर्तनावर आणि ध्यानावर सर्वजणांचे पुन्हा एकदा दृढतापूर्वक केंद्रण होऊ लागले.

अशीच काही वर्षे गेली आणि एका शुभ दिनी गुरूंनी शांतपणे आपला देह सोडला. शिष्यगणांनी नामसंकीर्तनाच्या आणि ध्यानाच्या वेळी त्या मांजराला खांबाला बांधून ठेवणे तसेच सुरू ठेवले.

एके दिवशी त्या गोंडस मांजराचा मृत्यू झाला. शिष्यगणांनी मीटिंग घेऊन यावर चर्चा केली की, गुरूंच्या शिकवणीचे जतन करणे किती महत्त्वाचे आहे. दृढ निश्चयासह ते बाजारात गेले आणि दुसरे एक मांजर विकत आणले, जेणेकरून नामसंकीर्तनाच्या आणि ध्यान करण्याच्या वेळी ते त्या मांजराला खांबाला बांधून ठेवू शकतील आणि अशा रीतीने गुरूंच्या शिकवणीचा सन्मान ते निष्ठापूर्वक करू शकतील.

संकल्पना आणि डिझाइन : गुरुमाई चिद्विलासानंद

डिझाइन प्रारूप : लिओ लेगोरेट्टा

चित्रांकन : द्योनिस्यो सबाय्योस

© २०१७ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन©. सर्वाधिकार सुरक्षित.
पूर्वलिखित अनुमतीविना या विषय-वस्तूच्या कोणत्याही अंशाची नक्कल करू नये.